दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

vadalvartanews@gmail.com ●संपादक : अजय भांगे ●उपसंपादक : गणेश गाडेकर https://epaper.vadalvarta.com

● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● रविवार दि.२७ जुलै २०२५ 9422660077 ● आरएनआय-एमएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष २ रे ● अंक २४१ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

● Beed (Mahmar) Daily Marathi ● Sunday 27 July 2025 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 2nd ● Issue 241 ● Pages 4 ● Rate 4 Rs

प्रतिनिधी नेमणे आहे

लोकप्रिय विभागीय दैनिक वादळ वार्ता साठी महाराष्ट्रात सर्वत्र जिल्हा, तालुका, सर्कल व गावस्तरावर प्रतिनिधी नेमणे आहे. तरी इच्छुकानी मो.न.9422660077, 9766440025 संपर्क साधावा.

# शेतकऱ्यांनो, जातीधर्माचे भूत डोक्यात घालून सरकारने तुमचे लढणे बंद केले-बच्चू कडू

**नेवासे (वृत्तसंस्था)**–राम मंदिर बांधले परंतु राम नावाचा शेतकरी आत्महत्या करतोय त्याचं पाप फेडणार कुठे? याचे उत्तर सरकारने दिले पाहिजे? मंदिर बांधायचे आणि शेतकऱ्याला आत्महत्या करायला लावायचे. हे सरकार जनतेला धर्मात अडकून ठेवायचे काम करत आहे. शेतकऱ्यांनो तुमचे कापड महाग होतात. परंतु कापसाचे भाव तिथेच राहतात. साखर महागते व उसाचे भाव तिथेच राहतात. तुम्ही नेहमी कर्जबाजारी राहिले पाहिजे, अशी व्यवस्था या निर्दयी सरकारने करून ठेवली आहे. तुमच्या डोक्यात जातीधर्माचे भूत घालून तुमचे लढणे बंद केले आहे. पेट्रोल, डिझेलचे भाव वाढवले. परंतु हे सर्व तुम्हाला जाणवले नाही पाहिजे यासाठी अफुची गोळी दिली आहे. या विरोधात तुम्ही लढले नाही पाहिजे, रस्त्यावर उतरले नाही पाहिजे, यासाठी वेळोवेळी सरकारने जातीधर्मात तुम्हाला गुरफटून ठेवले आहे, असा आरोप प्रहार जनशक्ती पक्षाचे संस्थापक व अध्यक्ष माजी मंत्री बच्चू कडू यांनी सरकारवर केला. नेवासे तालुक्यातील गळनिंब येथे कडू यांची गुरुवारी रात्री ९.३० वाजता हुंकार सभा करण्यात आली होती. त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी आहिल्यानगर प्रहार जनशक्ती पक्षाचे जिल्हाध्यक्ष ज्ञानेश्वर सांगळे, युवा जिल्हाध्यक्ष विधीज्ञ पांडुरंग औताडे, संपर्कप्रमुख बाळासाहेब खर्जुले, संघटक जालिंदर आरगडे, शेतकरी आर्मी प्रमुख रघुनाथ आरगडे, मधुकर शिंदे, आदी उपस्थित होते.

कडू म्हणाले, मंदिरे आमदारांच्या माध्यमातून बांधले जातात. परंतु शाळा तसेच शिक्षण व्यवस्थेचा पूर्ण बोजवारा उडवण्याचे काम या सरकारने केले आहे. शिक्षण महाग करून ठेवले आहे. या सर्व व्यवस्थेला आपल्याला तुडवावे लागेल. ही जातीभेदाची लढाई नसून अर्थ भेदाची लढाई असल्याचे ते म्हणाले.जे-जे कष्टकरी असतील, शेतकरी असतील, त्याची लढाई आपल्याला लढायची आहे. तो कोणत्याही जाती धर्माचा असला तरी काम करणारा असेल आणि त्याची लूट होत असेल, तर आम्ही तोडल्याशिवाय राहणार नाही, असा इशारा त्यांनी दिला.बेईमानाचे घ्यायचे नाही अन् ईमानदारीचे सोडायचे नाही बेईमानाचे घ्यायचे नाही व ईमानदारीचे सोडायचे नाही. त्यासाठी आंदोलनात सहभागी व्हा. रमी मोबाइलवर खेळले तर कारवाई होत नाही. परंतु तुम्ही चार-पाच जण बसून एकत्रित खेळले तर कारवाई होते. तुम्ही गावात रमी खेळले, तर पैसा गावात जाईल. परंतु मुंबईत रमी खेळले तर पैसा सरकारला जाईल, अशी टीका मंत्री कोकाटे यांच्या प्रकरणावर कडूंनी केली.



### इन्फिनिटीच्या एका एजंटचा आत्महत्येचा प्रयत्न

# गुंतवणूकदार हवालदिल,संचालकांना पकडण्यात पोलिसांना अपयश

**ईश्वर निमसे । अहिल्यानगर**

इन्फिनिटी बिकॉन गुंतूवणूकदार रोज येणाऱ्या नवनवीन माहितीमुळे हवालदिल होत आहेत. आता गुंतवणूकदार पैशाचा तगादा लावत असल्याने सुप्यात एका एजंटने आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. दिवसेंदिवस गुंतवणूकदार आक्रमक होत असताना पोलीस मात्र यातील दोषी संचालकांना पकडण्यात अपयशी ठरत आहेत.

कंपनीचे संचालक थेट दुबईला पळून गेल्याची चर्चा आहे.

महाराष्ट्रभर गाजत असलेला शेअर मार्केट घोटाळा नुकताच शेवगाव, पाथर्डीपाठोपाठ आता श्रीगोंदा, तसेच पारनेरमध्येही समोर आला आहे. यामध्ये काही पोलीस दलातील कर्मचारी लाचप्रकरणी निलंबित झाले आहेत. इन्फिनिटी बिकॉन कंपनीने लोकांकडून जवळपास साडेतीन हजार कोटी रक्कम शेअर मार्केटमध्ये गुंतवण्यासाठी जमा केलेली आहे. यातील खरा आकडा समोर आला नसला तरी अंदाजे ही रक्कम हजार कोटीच्या घरात असल्याची चर्चा आहे.

या कंपनीवर

काही ठिकाणी गुन्हे दाखल झालेले आहेत, तर काही ठिकाणी लोक उपोषणाला देखील बसलेले आहेत. यातच नवनवीन खुलासे समोर येत आहेत. नुकत्याच हाती आलेल्या माहितीनुसार गेल्या पाच महिन्यांमध्ये संचालकांमध्ये आपसात मतभेद असल्याचे लक्षात येत होते. परंतु हा बनाव देखील असू शकतो असे गुंतवणूकदार म्हणत आहेत. यातील प्रमुख संचालक नवनाथ अवताडे, अगस्त मिश्रा, राहुल काळोखे, देशमुख, विनोद गाडीळकर यांच्यातील मतभेद संपून एकमताने लोकांची मुद्दल परत करण्याचा ठराव त्यांनी केलेला आहे. ही मुद्दल परत करताना एक वर्षाचा कालावधी लागणार आहे, असे समजत आहे. परंतु हाही बनाव असण्याची शक्यता आहे. दहा हजार रक्कम जमा असलेल्या लोकांचे पैसे परत करण्याचे काम सुरू केले आहे असे समजत आहे. परंतू यात पैसे देण्यापूर्वी कंपनी गुंतवणूकदारांकडून एनओसी फॉर्म भरून घेतले जात आहे. यात लोकांना शंका आहे की एनओसी फॉर्म भरून दिल्यानंतर आणि सर्व डॉक्युमेंट्स दिल्यानंतर पैसे परत येतील की नाही. भारतीय चलनाने पैसे यात गुंतवलेले आहेत, परंतु कंपनी बिटकॉइन व यूएसडीसी अशा चलनाद्वारे पैसे परत करण्याचा दावा करत आहे. यातील गुंतवणूकदार हे ग्रामीण भागातील असल्यामुळे त्यांना या चलनाचा अभ्यास नाही. कंपनी गुंतवणूकदाराचे व्याज परत करेल की नाही यातही शंका आहे. म्हणजेच जरी मुद्दल हळूहळू कंपनीने परत केली तरी जमा रकमेवरील भले मोठे व्याज कंपनी गिळंकृत करणार आहे यात कुठेही शंका नाही. मात्र गुंतवणूकदारांना आपली मुद्दल आणि व्याज अशी पूर्ण रक्कम हवी आहे. त्यासाठी ते विविध ठिकाणी आंदोलन करत आहेत. अनेक ठिकाणी पोलिसांत तक्रारीही दाखल झाल्या आहेत. जोपर्यंत पूर्ण पैसे मिळत नाहीत तोपर्यंत गुंतवणूकदार कोणताही एनओसी फॉर्म भरून देणार नाहीत.

दरम्यान, लोकांनी यापुढे अशा फसव्या, कमी वेळात जास्त परतावा देणाऱ्या कंपनींना बळी पडू नये,असे आवाहन करण्यात येत आहे.

### आमरण उपोषणाचा इशारा मिळताच

# १५ महिने कुंभकर्णाची झोप घेतलेल्या महाराष्ट्र सरकारला जाग

**शिरूर पुणे । भाऊसाहेब पंदरकर**

भारतीय बहुजन पालक संघाचे राज्य संयोजक नाथाभाऊ पाचर्णे व त्यांचे सहकारी यांनी ९ जुलै रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, शिक्षणमंत्री दादाभुसे यांना शिरूर शहर व परिसरातील १० खाजगी शाळेंवर कायदेशीर कारवाई करण्यात यावी यासाठी आमरण उपोषणाचे निवेदन देण्यात आले होते.

शिरूर मधील या खाजगी शाळेंची दोन वेळा चौकशी होऊन गंभीर स्वरूपाची अनियमितता तसेच बेकायदेशीर रित्या फी गोळा करून पालक व विद्यार्थी यांचा छळ केल्याप्रकरणी या शाळेंची मान्यता काढण्यासाठी गेले १५ महिने मंत्रालयातील शिक्षण विभागात सदर प्रकरण भ्रष्टाचारी अधिकाऱ्यांच्या आशिर्वादाने प्रलंबित ठेवण्यात आले होते.भारतीय बहुजन पालक संघाचे राज्य संयोजक नाथाभाऊ पाचर्णे यांनी ९ जुलै रोजी आमरण उपोषणाचे पत्र दिल्या नंतर कुभकर्णाची झोप घेतलेल महाराष्ट्र सरकार जागे होऊन या बाबत तात्काळ पुढील कार्यवाही चालू केल्याचे निदर्शनास आले.भ्रष्ट प्रशासनाचा सुस्तावलेला




प्रकार हा अतिशय निंदनीय आहे,या बाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब यांना पत्र पाठवून सदर गंभीर प्रकरणात जाणिवपूर्वक विलंब करणाऱ्या भ्रष्ट अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी नाथाभाऊ पाचर्णे यांनी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणीस साहेब यांच्याकडे केली आहे. सदर प्रकरणी भ्रष्ट अधिकाऱ्यांवर व दोषी शाळेवर तात्काळ कारवाई करण्यात यावी अन्यथा १३ ऑगस्ट २०२५ रोजी आझाद मैदान मुंबई या ठिकाणी हजारो पालकांना घेऊन आमरण उपोषण करण्यात येईल असा इशारा भारतीय बहुजन पालक संघाचे राज्य संयोजक नाथाभाऊ पाचर्णे यांनी दिला आहे.

# माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या पासष्ठव्या वाढदिवसानिमित्त दहाफूट उंचीची पासष्ठ वृक्षची लागवड

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा शिवसेना पक्ष प्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या पासष्ठव्या वाढदिवसानिमित्त शिवसेना व शिक्षकसेनेच्या वतीने दहाफुट उंचीचे पासष्ठ वृक्षाचे रोपण जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांच्या नेतृत्वात करण्यात आले. शिक्षकसेनेच्या वतीने उद्धव बाळासाहेब ठाकरे यांचा वाढदिवस प्रेरणा वर्ष म्हणून साजरा होत आहे. शिवसेना व शिक्षकसेनेच्या वतीने आज बीड शहरातील पांगरी रोड परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. यामध्ये जांभूळ, पळस, नांदूरकी, इंडियन क्रिस्मस ट्री या सारखी उंच वाढणारी व परिपूर्ण वाढ झालेली दहा फुट उंचीची पासष्ट झाडे लावण्यात आली.

या वेळी शिवसेना जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांच्या सह राज्य शिक्षक सेनेचे विधानसभा प्रमुख सुशील पिंगळे, जिल्हा संघटक रतन तात्या गुजर, महिला आघाडी च्या मीराताई



नवले, उपजिल्हा प्रमुख राजाभाऊ माहुवाले, माजी पंचायत समिती सदस्य नवनाथ प्रभाळे महाराष्ट्रराज्य शिक्षकसेनेचे उपाध्यक्ष मा. दत्ताभाऊ पवार, मराठवाडा अध्यक्ष नामदेवरावजी सोनवणे , महाराष्ट्रराज्य तंत्रनिकेतन कर्मचारी महासंघाचे अध्यक्ष रवींद्र दहाटे सर, शिवसेनेचे जेष्ठ सल्लागार व शिवसैनिक संभाजी गजले सर, शिक्षकसेना जिल्हाध्यक्ष लक्ष्मण बहिरवाळ, संजय ढाकण, जिल्हा सरचिटणीस नरेश गंधगे, कार्याध्यक्ष आप्पा डोके, जिल्हा उपाध्यक्ष महादेव वाघमारे वाघमारे, बीड तालुका अध्यक्ष उद्धवजी घोडके, प्रसिद्धीप्रमुख लक्ष्मण वाघमारे, राजाभाऊ हुरकुडे गणेश लोणकर, रंगनाथ पैठणकर, सचिन साळुंखे सह आदी शिवसैनिक उपस्थित होते.

### मोमीनपुरा परिसर येथील सिमेंट रस्ता व नाली

# या विकास कामांचे लोकार्पण शेख निजाम यांच्या प्रयत्नास यश

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील अल्पसंख्यांक बहुल भागातील महत्त्वपूर्ण असा पेठ बीड विभागातील मिल्लत नगर, मोहम्मदया कॉलनी,बीड मामला,ढगे कॉलनी भागामध्ये मागील अनेक वर्षापासून रस्ते नाली नसल्यामुळे खुप त्रास सहन करावा लागला यापूर्वी अनेक वेळा सदरील भागामध्ये वेगवेगळ्या पक्षाच्या नेत्यांनी सदरील भागातील विकास कामांचे उद्घाटनाचे अनेक नारळ फोडले परंतु प्रत्यक्षात कधी या भागाचा विकास झाला नाही किंवा होऊ दिला नाही याबाबतचा प्रश्न या भागातील राहणाऱ्या नागरिकांच्या मनात होता रस्ते नाल्या विद्युत पथदिवे स्वच्छता यासारख्या नागरी मूलभूत सुविधा उपलब्ध नसल्यामुळे या ठिकाणी वास्तव्य करणाऱ्या नागरिकांना मोठ्या त्रासाला व अडचणींना सामोरे जावे लागत होते सदरील बाब त्या भागातील लोकांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शेख निजाम यांच्या कानावर घातली असता त्यांनी माननीय नामदार तथा पालकमंत्री बीड जिल्हा श्री अजित दादा पवार माजी मंत्री



आमदार धनंजय मुंडे साहेब राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश सरचिटणीस अमरसिंह पंडित साहेब आमदार विजयसिंह पंडित साहेब यांच्या माध्यमातून सदरील भागातील रस्ते व नाल्यांचा प्रश्न कायमस्वरूपी सोडवला मागील पन्नास वर्षापासून प्रलंबित राहिलेला विकास सदरील झालेल्या कामामुळे पूर्ण झालेला असून बाकी राहिलेला विकास काम लवकरच पूर्ण होणार असल्याचे चित्र दिसत आहे या झालेल्या विकास कामांचे लोकार्पण व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नवनियुक्त पदाधिकाऱ्यांच्या सत्काराचे आयोजन बीड राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष व शेख निजाम मित्र मंडळ यांच्यातर्फे दिनांक २७ जुलै २०२५ सायंकाळी ठीक ७ वाजता करण्यात येणार असून यावेळी सदरील कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून गेवराई विधानसभेचे आमदार विजयसिंह पंडित शेख निजाम यांच्या प्रमुख उपस्थिती राहणार असून सदरील विकास कामांचे लोकार्पण व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नवनियुक्त पदाधिकाऱ्यांच्या सत्कार समारंभास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन मिल्लत नगर मोहम्मद कॉलनी भागाचे माजी नगरसेवक हाफिज अशपाक ,मोमीन जुबेर, सत्तार भाई इनामदार, सय्यद आजम, शेख कदीर, शेख जाकीर, शेख नसीर शेख हमीद, शेख सर्फराज, आदींनी केले आहे.

# महाराष्ट्रात रमीला राजमान्यता द्या अंबादास दानवे यांचा कृषिमंत्र्यांना टोला

**मुंबई (वृत्तसंस्था)**–शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते तथा विधानपरिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी विधिमंडळात कथितपणे रमीचा डाव खेळणाऱ्या कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांचा खरपूस समाचार घेतला आहे. महायुती सरकारने महाराष्ट्रात रमीला राजमान्यता द्यावी. तसेच या प्रकरणीचा अध्यादेश तातडीने जारी करावा, असे ते म्हणालेत.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांचा विधिमंडळात मोबाईलवर रमी गेम खेळतानाचा एक व्हिडिओ पोस्ट केला आहे. या व्हिडिओमुळे महायुती सरकारची पुरती अब्रु केली आहे. विशेषतः उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेसचीही या प्रकरणी पुरती नामुष्की झाली आहे. या घटनाक्रमानंतर माणिकराव कोकाटे यांनी मंगळवारी सकाळी पत्रकारांशी संवाद साधताना आपण कोणतीही मोठी चूक केली नसल्याचा दावा केला. तसेच या प्रकरणी विरोधकांनी केलेले आरोपही फेटाळून लावले. या पार्श्वभूमीवर अंबादास दानवे यांनी त्यांच्यावर हल्ला चढवला आहे.कृषिमंत्र्यांनी आपण रमी खेळत होतो हे कबुल केले पाहिजे. रमी खेळताना ते आपले डोके खाजवत होते. पॉपअपसाठी डोके खाजवावे लागते का? तुम्ही राज्याचे कृषिमंत्री आहात. या प्रकरणी मुख्यमंत्री हतबल झालेत.

संपादकीय

# गरिबांचा बँकर ते आश्वासक नेतृत्व

'इफ यू इमॅजिन, इट कॅन हॅपन, इफ यू डोंट इमॅजिन, इट विल नेव्हर हॅपन'. बांगलादेशच्या हंगामी सरकारचे प्रमुख, अर्थतज्ज्ञ मोहम्मद युनूस यांच्या ग्रामीण फाऊंडेशनच्या संकेतस्थळावरील हे वचन. त्याच्या अर्थाप्रमाणे, युनूस यांनी सरकारच्या प्रमुखपदी विराजमान होण्याची कल्पना केली असण्याची शक्यता नाकारता येत नाही; मात्र, अभूतपूर्व अराजकाच्या स्थितीत देशाचे नेतृत्व करावे लागेल, अशी पुसटशी कल्पनाही त्यांनी केली असण्याची शक्यता कमीच. त्यांच्याच भाषेत सांगायचे तर, 'हे देशाचे दुसरे स्वातंत्र्य आहे.' 'हे स्वातंत्र टिकवायला हवे, बांगलादेशने पुन्हा उभारी घ्यायला हवी', अशी मनोकामना त्यांनी व्यक्त केली आहे. ती पूर्ण होईल का, हा प्रश्न तूर्त अनुत्तरित असला तरी युनूस यांचा पूर्वेतिहास आश्वासक ठरतो.बांगलादेशच्या चितगाँगमध्ये १९४०मध्ये जन्मलेले युनूस हे त्यांच्या आईवडिलांच्या नऊ अपत्यांपैकी तिसरे. प्राथमिक शिक्षणानंतर त्यांनी ढाका विद्यापीठातून अर्थशास्त्रात बीए आणि एमए केले आणि काही वर्षे याच विद्यापीठात अध्यापनाची जबाबदारी स्वीकारली. फुलब्राईट स्कॉलरशीपद्वारे ते उच्च शिक्षणासाठी अमेरिकेत गेले. तिथल्या व्हंडरबिल्ट युनिव्हर्सिटीतून त्यांनी अर्थशास्त्रात पीएच. डी. मिळवली आणि तिथेही काही काळ त्यांनी अध्यापनाचा मार्ग निवडला. त्यावेळी बांगलादेश मुक्ती संग्राम ऐन भरात होता. मायदेशाबद्दल अपार जिव्हाळा असलेल्या युनूस यांना स्वस्थ बसणे शक्यच नव्हते. त्यांनी पाकिस्तानला होणारी लष्करी मदत रोखण्यासाठी अमेरिकी संसदेच्या नेत्यांकडे विनवणी केली. शिवाय, वॉशिंग्टनमध्ये 'बांगलादेश इन्फॉर्मेशन सेंटर' सुरू करून त्यांनी बांगलादेशच्या स्वातंत्र्यलढ्यात अमेरिकेतून बळ दिले. बांगलादेश स्वातंत्र्यानंतर त्यांनी मायदेशी परतण्याचा निर्णय घेतला आणि १९७२मध्ये चितगोंग विद्यापीठाच्या अर्थशास्त्र विभागाच्या प्रमुखपदाची सूत्रे स्वीकारली.स्वातंत्र्यानंतर स्थिरस्थावर होत असतानाच बांगलादेश भीषण दुष्काळात भरडला गेला. त्यात देशातील सुमारे दीड कोटी नागरिकांचा बळी गेला. गरिबांबद्दल कणव असलेल्या युनूस यांना हे दु:ख असह्य झाले. विद्यापीठाच्या वर्गात अर्थशास्त्राचे धडे देण्यापेक्षा ते दारिद्र्य निर्मूलनासाठी प्रत्यक्षात अमलात आणण्याचा निर्णय त्यांनी घेतला. दुष्काळापीडितांचे प्रत्यक्ष नुकसान झालेले नसेल तर त्यांना बँका कर्ज देत नसल्याचे युनूस यांना आढळले. त्यामुळे सुरुवातीला त्यांनी स्वत: ४२ कुटुंबांना कर्ज दिले. त्यातून व्यवहारांना चालना मिळेल, असा त्यांचा प्रयत्न होता. 'गरीब कर्जासाठी अपात्र नाहीत. त्यांना कर्ज मिळायलाच हवे. वाजवी व्याजदाराने कर्ज दिले तर ते वेळेवर कर्जफेडही करतात', असे युनूस यांचा अनुभव. त्यातूनच पुढे ग्रामीण बँकेचा प्रयोग आकारला आला. 'माझ्या सभोवती दारिद्र्यच दारिद्र्य दिसत होते. मी त्याकडे दुर्लक्ष करू शकलो नाही. मला या पिचलेल्या लोकांसाठी काहीतरी करायचे होते म्हणून मी हे काम हाती घेतले. पण, ते धोरणकर्ता किंवा संशोधक म्हणून नव्हे', असे युनूस म्हणतात. मात्र, त्यांनी केलेले काम अस्सल धोरणकर्त्यासारखेच पथदर्शी आहे.सर्वसाधारणपणे जे कर्ज मिळवण्यास अपात्र ठरतात त्यांना छोटी-छोटी कर्जे वितरित करण्याचे उद्दिष्ट ठेवून १९८३मध्ये युनूस यांनी ग्रामीण बँकेची स्थापना केली. दुष्काळामुळे प्रत्यक्ष नुकसान झालेले असो वा नसो, गरिबांना कर्जवितरणावर बँकेने भर दिला. अल्पावधीतच बांगलादेशात ग्रामीण बँकेने पाय घट्ट रोवले. बँकेने कर्ज वितरणावेळी '१८ निर्णय' अशी अनोखी संकल्पना राबवली. त्यानुसार, कर्जदाराला काही निर्णयांचे पालन करण्याचे वचन घ्यावे लागे. उदा. आपल्या मुलांना शिक्षण देऊ, आरोग्यदायी जीवनशैलीचा अंगीकार करू, वगैरे वचन कर्जदारांना देणे बंधनकारक होते. त्याचा सकारात्मक परिणाम झाला. महिला सक्षमीकरणाला बळकटी मिळाली, शाळेतील पटसंख्या वाढू लागली, घरांत स्वच्छतेकडे बारकाईने लक्ष दिले जाऊ लागले, बालमृत्यूचे प्रमाण घटू लागले. ही बँक इतकी यशस्वी झाली की अगदी भिक्षेकऱ्यांनाही कर्ज मिळत होते. बँकेने बांगलादेशच्या समाजव्यवस्थेत नवे परिवर्तन घडविले. त्यामुळेच मोहम्मद युनूस आणि ग्रामीण बँकेला सन २००६च्या नोबेल पुरस्काराने गौरविण्यात आले.आज चार दशकांनंतर या बँकेच्या कर्जदारांची संख्या एक कोटी ६० लाख आहे. त्यात महिलांची संख्या ९७ टक्के आहे. बँकेने आत्तापर्यंत ३८ अब्ज डॉलरचे कर्जवितरण केले. कर्जवसुलीचे प्रमाण ९६.३ टक्के इतके उच्च आहे. देशातील द्रारिद्र्य निर्मूलन कार्यक्रमात या बँकेचे मोठे योगदान आहे. सध्या देशात दारिद्र्यरेषेखालील लोकांचे प्रमाण सुमारे १८ टक्के इतके कमी आहे. या बँकेच्या यशानंतर जगभरात सुक्ष्म वित्तपुरवठा संस्था पुढे आल्या. भारतात विशेषत: पश्चिम बंगालमधील बंधन ही वित्तसंस्था त्यापैकीच एक. जगातील सुमारे १०० देशांनी ग्रामीण बँकेचे अनुकरण केले आहे. हे या बँकेचे यश असले तरी तिचे टीकाकारही कमी नाहीत. ग्रामीण बँकेच्या काही योजनांमध्ये जादा व्याजदरामुळे कर्जदार आणखी गाळात जातात, असे या टिकाकारांचे म्हणणे. त्यावर, 'पैसे कमावणे नव्हे, तर गरिबांना मदत करणे आणि छोट्या उद्योगांना अर्थबळ देणे हेच बँकेचे उद्दिष्ट आहे', असे प्रत्युत्तर युनूस देतात.देशातील जनक्षोभानंतर पदच्युत होऊन अज्ञातवासात गेलेल्या शेख हसीना आणि मोहम्मद युनूस यांच्यात याआधी अनेकदा संघर्ष झाला. 'ग्रामीण बँक ही स्वत:ची मालमत्ता असल्यासारखे युनूस यांचे वर्तन असून, ही बँक गरिबांच्या रक्ताचे शोषण करीत आहे', अशी टीका हसीना यांनी केली होती. एवढेच नव्हे, तर हसीना यांनी निवृत्तीवयाच्या नियमावर बोट ठेवून या बँकेच्या व्यवस्थापकीय संचालकपदावरून युनूस यांना दूर केले. मात्र, त्यानंतरही देशासह जगभरात युनूस यांच्याभोवती असलेले वलय कमी झाले नाही.युनूस यांनी सन २००७मध्ये सार्वत्रिक निवडणुकीच्या तोंडावर 'नागरिक शक्ती पक्ष' नावाच्या राजकीय पक्षाची घोषणा केली होती. मात्र, त्यांना अपेक्षित पाठबळ मिळाले नाही. शिवाय हसीना यांनी त्यांच्यामागे चौकशीचा ससेमिरा लावला होता. 'राजकारणातील नवखे हे नेहमीच धोकादायक असतात, त्यांच्यापासून सावध राहायला हवे', अशी खोचक टिप्पणी हसीना यांनी केली होती. अखेर काही महिन्यांतच युनूस यांनी राजकीय पक्षाचा विचारच सोडून दिला. त्यानंतरही बदनामीचा खटला, करचुकवेगिरी आदींचे आरोप त्यांच्यावर झाले. कामगार कायद्याचे उल्लंघन केल्याप्रकरणी न्यायालयाने गेल्या जानेवारीत युनूस यांना सहा महिन्यांच्या तुरुंगवासाची शिक्षाही सुनावली. अलीकडेच युनूस यांच्यावर दूरसंचार कंपनीतील कर्मचारी कल्याण निधीतील २.२ दशलक्ष डॉलर्सच्या अपहाराचा आरोप ठेवण्यात आला. गैरव्यवहार आणि नियम उल्लंघनाचे सुमारे १५० गुन्हे युनूस यांच्यावर आहेत. मात्र, हे सर्व गुन्हे खोटे आणि राजकीय हेतूने प्रेरित असल्याचा युनूस यांचा दावा आहे. देशाच्या जनक्षोभाचे जनक ठरलेल्या विद्यार्थी आंदोलकांनाही त्याची कल्पना असावी. त्यामुळेच त्यांनी या महत्त्वाच्या टप्प्यावर नेतृत्वासाठी युनूस यांची निवड केली.युनूस यांनी अलीकडेच तीन शून्यांची संकल्पना मांडली होती. 'शून्य दारिद्र्य, शून्य बेरोजगारी आणि शून्य कर्बउत्सर्जन' ही ती संकल्पना. त्यासाठी आपले संपूर्ण जीवन समर्पित असल्याचे युनूस यांनी म्हटले आहे. बांगलादेशचा 'हंगामी प्रमुख' म्हणून युनूस यांना फार मोकळीक मिळणार नाही. मात्र, या निर्णायक वळणावर स्वकल्पनेप्रमाणे देशाला दिशा देण्याची संधी त्यांना आहे.

# आजार आणि माणूस

एका जिल्ह्याच्या ठिकाणी मनोविकारतज्ज्ञाचा व्यवसाय स्थिर करण्याच्या धडपडीच्या काळातील गोष्ट. त्याकाळी इतर शाखांचे, म्हणजे अस्थिरोग, नेत्रविकार, हृदयविकार वगैरे विषयांचे किमान शंभरावर पदव्युत्तर तज्ज्ञ असलेल्या गावात एकही मनोविकारतज्ज्ञ नव्हता. मला सहव्यावसायिक म्हणू लागले, 'तुमची काय, चांदी आहे. कुणीही स्पर्धक नाही! एकहाती सत्ता.' जणू काही मी सार्वजनिक मक्तेदारी असलेल्या विद्युतपुरवठा महामंडळाचा अधिकारी होतो.मला स्पर्धक तज्ज्ञ नसतील, पण गावोगावी पसरलेले भोंदू बुवा, बाहेरबाधा पाहणारे स्वयंघोषित महाराज, झाडपाला करणारे मांत्रिक हे सारे माझे स्पर्धक. मनोविकारांच्या शास्त्रीय ज्ञानाचे स्पर्धक. ते आजही आहेत. माझा सुरुवातीचा अनुभव असा की माझ्याकडे येणारा एकही रुग्ण 'जाणकार मांत्रिकाकडे' जावून आलेला नसेल असे झाले नाही. बाहेरची बाधा असेल या समजुतीच्या आहारी जाऊन तब्बल एकेक वर्ष मानसिक उपचारापासून वंचित असंख्य रुग्ण. हे भोंदू बाबांनी केलेले बाहेरचे उपचार तरी कसे? कडूलिंबाच्या फांदीने झोडपणे, उपाशी ठेवणे, डोळ्यात रीठ्याचा रस पिळणे. मूळ मनोविकार बाजूला राहून डोळ्याचा दाह आणि जंतुसंसर्गाचा उपचार हा आणीबाणीचा होऊन बसायचा. अंगारेधुपारे परवडले, कमीतकमी ते निरुपद्रवी तरी असतात.शहरातील सुशिक्षित लोकांच्या मनात मनोविकारांविषयी उदंड गैरसमजुती आहेत. शहर म्हणजे काय? पुलंच्या शब्दात, धोब्याच्या धुलाईने आणि शिंप्याच्या शिलाईने पुढारलेली ही खेडी. मनोविकारांविषयी धारणा सारख्याच. एक उच्चविद्याविभूषित स्त्री सांगत होती, 'मागल्या महिन्यात मी टोरोंटोला गेले होते, तिथे एका कॅनेडियन बाईकडे आठ दिवस मुक्काम होता. ती विमानतळावर सोडायला आली आणि म्हणाली, सॉरी मला लगेच परत जायला हवं कारण माझी सायकियाट्रिस्टकडे अपॉइंटमेंट आहे! मी दचकलेच. मनात विचार केला, गेली आठ दिवस मी एका वेड्या बाईच्या संगतीत होते, बापरे!' आता बोला. मानसिक आजारांकडे सहजपणे पाहण्याचा हा निकोप दृष्टीकोन आपल्या समाजात रुजायला किती वर्षं लागतील कुणास ठाऊक.मानसिक विकारांचा स्वीकार सोडा, त्यांना मनाच्या 'कमजोरीचे' लक्षण समजले जाते. कधी व्यक्तीचे न्यून. मनाचा दुबळेपणा. 'डिप्रेशन यायला काय झालं? पुरुषासारखा पुरुष तू, असे हातपाय गळून काय बसलास? अशी कोणती आपत्ती येऊन कोसळली?' आणि स्त्री असेल तर,



'काय कमी आहे तुला? सोन्यासारखा संसार आहे, राहायला घर आहे, खाण्यापिण्याची कमतरता नाही, कशाचं आलं डिप्रेशन? सगळी भरल्या पोटाची थेरं! उन्हापावसात शेतावर राबणाऱ्या बाया पाहा, काही होत नाही त्यांना,' हा वर टोमणा. पोटाच्या दुबळेपणासाठी पोटाचा डॉक्टर, हृदयाच्या दुबळेपणासाठी हृदयरोगतज्ज्ञ, तर मनाच्या दुबळेपणासाठी मनाचा डॉक्टर का नको?डिप्रेशन हा बऱ्याच अंशी मेंदू-रसायनांच्या कमतरतेमुळे होत असतो हे शास्त्रीय सत्य. त्यासाठी भोवतालचे घटक जितके महत्त्वाचे त्याहून महत्त्वाची भूमिका चेतारसायनांची, मात्र याची जाणीव भल्याभल्यांना नसते. आजही नाही. ही गोष्ट इथलीच नाही, प्रगत देशांतही मनोविकार माणसाच्या कमकुवत वृत्तीमुळे होतात, भोवताली घडणाऱ्या घटनांमुळे होतात हाच सर्वसाधारण समज आहे. त्यामुळे हा शारीरिक आजारांइतकाच शारीर आहे, याबद्दल अज्ञान आहे. या अज्ञानाची पुढची पायरी म्हणजे लोकांचा गोळ्या खाण्यावर, खाणाऱ्यावर आक्षेप. मानसिक आजारांवर दिल्या जाणाऱ्या यच्चयावत गोळ्या या 'झोपेच्या' असतात हा एक मोठा गैरसमज. गोळ्यांमुळे विचार कसे बदलतील? भावना कशा बदलतील, हा प्रश्न अनेकांना पडण्याचे कारण, मनात विचार आणि भावना उत्पन्न होणे हा चेतारसायनांचा खेळ आहे हे लोकांना कळत नाही. घरचे लोक गोळ्यांचा 'अनावश्यक' खर्च करायला तयार नाहीत म्हणून नाईलाजाने उपचार बंद करणारे तरुण मी पाहिले आहेत. ही परिस्थिती काही अंशी बदलली आहे, तरी ज्या निष्ठेने एखादा माणूस मधुमेहाच्या किंवा उच्चरक्तदाबाच्या गोळ्या जन्मभर अनुक्रमे साखरेचे किंवा मिठाचे पथ्य पाळीत घेतो त्या निष्ठेने मनोविकारांच्या गोळ्या घेत नाही.या गोळ्यांची सवय लागते हा अजून एक अवैज्ञानिक आक्षेप. सवय आणि गरज यात फरक असतो हे लोकांना कळत नाही. शरीराला अन्नाची गरज असते म्हणून माणूस रोज जेवतो, पाण्याची गरज असते म्हणून पाणी पितो. आता ते जन्मभर करावे लागते म्हणून त्याला कुणी 'जेवण्याची सवय लागली हो' असे म्हणेल का? गरज नसलेल्या किंवा अपायकारक गोष्टींचे सेवन म्हणजे (वाईट) सवय.मानसशास्त्र हे (इतर शाखांच्या) तुलनेनं नवखं शास्त्र, त्यामुळे त्यावरचे उपचार परिपूर्ण नाहीत. मेंदू-मनाचं कार्य गुंतागुंतीचं, त्यामुळे संशोधन चाचपडत पुढे जातं आहे. त्यात एमबीबीएसच्या विद्यार्थ्याला मानसशास्त्र हा विषय नावापुरता. त्याचा परिणाम असा की डॉक्टरीच्या इतर शाखांनाही त्याची अगदी जुजबी माहिती, त्यामुळे मनोविकारांबद्दल सार्वत्रिक गैरसमज. 'तुमच्या शाखेत काही तपासण्याच नाहीत.

नुसतं ऐकणं आणि बोलणं. रक्ताच्या चाचण्या, सोनोग्राफी, एमआरआय इत्यादींमध्ये शरीराचा पीडित भाग दिसतो, त्याचं आपण निदान करू शकतो, उपचार करू शकतो. जे मुळात दिसतच नाही त्यावर हे मनोविकारतज्ज्ञ कसा उपचार करू धजतात त्यांचं तेच जाणोत!' असं एका तज्ज्ञानेच मत मांडलं. मनोविकारांत माहिती घेणं, हीच महत्त्वाची तपासणी. तशा पूरक चाचण्या आहेत, मेंदू-विद्युत आलेख आहे, पण 'मन दिसेल' असा एक्सरे काढता येत नाही. त्यापेक्षा महत्त्वाचा मुद्दा, जो इतर शाखांनाही लागू पडतो तो तज्ज्ञाच्या 'क्लिनिकल अक्युमेन'चा. तपासण्या या तज्ज्ञाच्या निदानासाठी पूरक आहेत, त्या ज्ञान आणि अनुभवाच्या परिपक्वतेची जागा घेऊ शकत नाहीत.औषधीशास्त्राच्या पुस्तकातलं पहिलं वाक्य आहे, 'मेडिसिन इज ए सायन्स अँड आर्ट ऑफ ट्रीटिंग इल पीपल.' प्रत्येक कलेचं एक शास्त्र असतं आणि प्रत्येक शास्त्रात एक कला दडलेली असते. वैद्यकशास्त्र (त्यात मानसरोगशास्त्र आलं) तेवढीच कला आहे, जेवढं शास्त्र. सगळ्या महागड्या चाचण्यांपेक्षा अनुभवानं येणारं क्लिनिकल अक्युमेन म्हणजे ठोकताळा महत्त्वाचा. 'मेडिसिन इज एन आर्ट ऑफ द प्रोबेबल.' रुग्णाच्या प्रकृतीचं काय बिनसलं असू शकतं हे अनुभवाधारित अनुमान सत्याच्या जितक्या जवळ नेऊ शकतो तो यशस्वी डॉक्टर.विद्यार्थी जीवनातली माझ्या गुरूंची एक शिकवण आजही लक्षात आहे. एका रुग्णाला मी तपासत होतो. त्याला कधी फिट आल्याचं आठवत नव्हतं, मात्र त्याच्या मेंदू-आलेखात अपस्माराच्या (फिट) खुणा दिसत होत्या. 'त्यावरच्या गोळ्या लिहू का?' या माझ्या प्रश्नावर सर शांतपणे म्हणाले, 'तुला मेंदू-आलेखाचा इलाज करायचा आहे की रुग्णाचा?'आज मला गुरूंच्या जागी हिपोक्रेटस दिसू लागतो. आधुनिक वैद्यकशास्त्राचा आद्य ग्रीक गुरू. तो म्हणतो, 'एखाद्या माणसाला झालेला आजार समजण्यापेक्षा आजार झालेला माणूस समजून घेणं मला जास्त महत्त्वाचं वाटतं.' इसवी सनापूर्वी पाचव्या शतकात होऊन गेलेल्या या महानुभावाची शिकवण मनात झिरपायला पाव शतकाचा कालावधी लागला, हा फायद्याचा सौदा!

# औषधांनी रोखा प्री डायबेटिक अवस्था

आपला देश जागतिक पातळीवर मधुमेहाची राजधानी म्हणून ओळखला जाऊ लागला आहे. 'इंडिया डायबिटिस' हा वीस वर्षांपेक्षा मोठ्या वयाच्या प्रौढ भारतीयांवर केलेल्या संशोधनाचा अहवाल 'आयसीएमआर'ने गेल्या वर्षी प्रकाशित केला. या अभ्यासानुसार, भारतात १० कोटी, म्हणजे लोकसंख्येच्या ११.४ टक्के मधुमेही आहेत आणि १३.६ कोटी, म्हणजे लोकसंख्येच्या १५.३ टक्के प्री डायबेटिक किंवा मधुमेहपूर्व स्थितीत आहेत. साहजिकच, मधुमेह होण्याची शक्यता असलेल्या व्यक्तींना या दुर्धर विकारापासून कसे दूर राहता येईल, याबाबत व्यक्तिगत आणि सरकारी पातळीवर प्रयत्न व्हायला हवेत.

मधुमेह अजिबात नसणे आणि 'टाइप-२' मधुमेह असणे, यांच्या दरम्यानच्या अवस्थेला मधुमेहपूर्व अवस्था म्हणतात. या अवस्थेचे निदान करण्यासाठी 'ग्लुकोज टॉलरन्स टेस्ट' केली जाते. यामध्ये व्यक्तीची उपाशीपोटीची रक्तशर्करा मोजून, त्याला ७५ ग्रॅम ग्लुकोज ग्लासभर पाण्यातून दिले जाते. त्यानंतर दर अर्ध्या तासाने त्याच्या रक्तशर्करेचे मोजमाप केले जाते. यात मधुमेह नसलेल्या व्यक्तीची शर्करापातळी उपाशीपोटी ८० ते १०० मिलिग्रॅम असते. प्री डायबेटिक व्यक्तीचे हे मोजमाप १२० ते १४५ मिलिग्रॅमच्या दरम्यान असते. ग्लुकोज दिल्यानंतर दर अर्ध्या तासाने केलेल्या मोजणीमध्ये त्याची पातळी १४०-१९५च्या दरम्यान राहत असल्यास त्या व्यक्तीला मधुमेहपूर्व अवस्था आहे, असे मानले जाते. अशा व्यक्तींची 'एचबीए१सी' या चाचणीची पातळी ५.७ ते ६.४ टक्क्यांच्या दरम्यान असल्यास, प्री डायबेटिक अवस्थेच्या निदानाची खात्री होते.

सर्वसाधारणपणे प्री डायबेटिक व्यक्तींपैकी जवळजवळ ५० टक्के पुढील काळात मधुमेही बनतात. काही प्रयत्न करून प्री डायबेटिक अवस्था लांबवता आली, तर मधुमेह खूप उशिरा होतो आणि त्यात गुंतागुंत उद्भवत नाही.

**प्री डायबेटिक व्यक्ती आणि मधुमेह प्रतिबंध**

मधुमेह असलेल्या व्यक्तींना हृदयविकार होण्याची आणि स्ट्रोक येण्याची शक्यता मधुमेह नसणाऱ्या व्यक्तींपेक्षा दोन ते चार अधिक असते. मधुमेहाबाबत महत्त्वाची गोष्ट म्हणजे, हा एक 'मूक आजार' असतो.




सुरुवातीला याची कोणतीही लक्षणे जाणवत नाहीत. रक्ताच्या तपासणीतूनच त्याचे निदान होते. चाळिशीनंतर प्रत्येक व्यक्तीने दर वर्षी रक्तातील साखर आणि 'एचबीए१सी' या चाचण्या करायला हव्यात.

मधुमेह टाळण्यासाठी असलेल्या उपायांमध्ये, जीवनशैलीत परिणामकारक बदल करून, वजन नियंत्रित राखणे गरजेचे असते. त्यासाठी बॉडी मास इंडेक्स (बीएमआय) २० ते २४च्या दरम्यान राखावा लागतो. यासाठी रोज किमान २५ मिनिटे मध्यम प्रतीचा शारीरिक व्यायाम नियमितपणे करणे आणि शर्करायुक्त; तसेच तैलयुक्त स्निग्ध पदार्थ कमी करून, रोजचा आहार १४०० ते १५०० कॅलरींपर्यंत मर्यादित ठेवणे आवश्यक असते. 'चंडीगड अर्बन डायबिटिस स्टडी ग्रुप' यांनी केलेल्या दीर्घकालीन आणि व्यापक संशोधनानुसार, भारतातील व्यक्तींनी वजन योग्य पातळीत राखण्याची काळजी न घेतल्यास, रक्तातील शर्करापातळी सामान्य असूनही, १० वर्षांच्या कालावधीत, १३.६ टक्के लोकांना लोकांना मधुमेह होतो, तर १९.६ टक्के व्यक्ती प्री डायबेटिक बनतात. प्री डायबिटिसची सुरुवात असलेल्यांपैकी ५५.७ टक्के व्यक्ती मधुमेहामध्ये रूपांतरित होतात. प्री डायबिटिसचा धोका वाढवणाऱ्या घटकांमध्ये - ४५ वर्षांपेक्षा अधिक वय, बीएमआय २५ पेक्षा जास्त, बैठ्या जीवनशैलीमुळे शारीरिक निष्क्रियता, मधुमेहाचा कौटुंबिक इतिहास, पोटाचा वाढता घेर, उच्च रक्तदाब, गर्भावस्थेमध्ये मधुमेह होण्याचा इतिहास, कोलेस्टेरॉल आणि ट्रायग्लिसेरॉइड्सची पातळी वाढलेली असणे, यांचा समावेश होतो.

'दा किंग प्रिव्हेन्शन स्टडी'नुसार जीवनशैलीतील बदलांमुळे, प्री डायबिटिक व्यक्तीने दोन किलो वजन कमी केल्यास, दृष्टिदोष असलेल्या लोकांमध्ये रेटिनोपॅथीमध्ये ४० टक्के घट होऊ शकते. नेफ्रोपॅथी, न्यूरोपॅथी आणि सूक्ष्म रक्तवाहिन्यासंबंधी गुंतागुंत होण्याचे प्रमाण २८ टक्क्यांनी कमी होते.

**औषधांनी मधुमेह रोखणे**

जीवनशैलीमध्ये बदल घडवून, त्याचे सातत्याने पालन करणे, हे दैनंदिन जीवनात एक आव्हानच असते. त्यासाठी उच्च पातळीचे मनोबल लागते. साधारणपणे ७० टक्क्यांपेक्षा जास्त व्यक्तींना ते जमत नसल्यामुळे, औषधे वापरण्यावाचून पर्याय नसतो. 'टाइप-२' मधुमेह रोखण्यासाठी किंवा तो पूर्णपणे उद्भवण्यात विलंब करण्यासाठी मेटफॉर्मिन, अल्फा-ग्लुकोसाइडेज इनहिबिटर, इंक्रेटिन रिसेप्टर ॲगनिस्ट (उदा. लिराग्लुटाइड आणि सेमॅग्लुटाइड), थायाझोलिडिनडायोन्स अशी औषधे वापरता येऊ शकतात. यापैकी मेटफॉर्मिन हे बऱ्यापैकी सुरक्षित आणि अत्यंत कमी खर्चात मिळणारे आहे. मधुमेह रोखण्यासाठी, बीएमएआय आणि कोलेस्टेरॉल कमी करण्यासाठी या औषधाची उपयुक्तता, अनेक क्लिनिकल चाचण्यांमध्ये, विशेषत: तरुण आणि जास्त वजन असलेल्या रुग्णांमध्ये सिद्ध झाली आहे. इंडियन डायबिटिस प्रिव्हेन्शन प्रोग्रॅममध्ये, ग्लुकोज टॉलरन्स चाचणीत दोष आढळलेल्या भारतीय व्यक्तींमधील 'टाइप-२' मधुमेहाची शक्यता कमी करण्यासाठी, जीवनशैलीतील बदलासोबत मेटफॉर्मिन वापरल्यास फायदेशीर परिणाम होतात, असे सिद्ध झाले आहे. या संस्थेच्या संशोधनानुसार, केवळ जीवनशैलीतील बदल केल्यास मधुमेह होण्याची जोखीम २६.५ टक्क्यांनी कमी होते, केवळ मेटफॉर्मिन वापरल्यास ती २६.४ टक्क्यांनी कमी होते; पण जीवनशैलीतील बदल आणि मेटफॉर्मिन एकत्रित केल्यास मधुमेह होण्याची जोखीम २८.२ टक्क्यांनी कमी होते.मधुमेहाच्या उपचारामध्ये 'अमेरिकन डायबिटिस असोसिएशन'तर्फे दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांचे जगभरात पालन केले जाते. या संस्थेने जाहीर केल्यानुसार, 'टाइप-२' मधुमेहाची उच्च जोखीम असलेल्या २५ ते ५९ वयाच्या प्रौढांमध्ये, बीएमआय ३५पेक्षा जास्त असेल, उपाशी पोटीची शर्करा ११० मिलिग्रॅमपेक्षा अधिक असेल, 'एचबीए१सी' सहा टक्क्यांपेक्षा अधिक असेल आणि स्त्रियांना गरोदर अवस्थेतल्या 'जेस्टेशनल डायबिटिसचा इतिहास असेल, तर त्यांना मेटफॉर्मिन द्यावे.मधुमेही रुग्णांची वाढती संख्या, हे भारताच्या आरोग्यव्यवस्थेवरचे एक ओझेच आहे. या वाढत्या संख्येचे नियंत्रण करण्यासाठी प्रतिबंधात्मक आणि उपचारात्मक अशा दोन्ही उपायांवर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. प्री डायबिटिसची 'टाइप-२' मधुमेहापर्यंत होणारी प्रगती रोखण्यासाठी मेटफॉर्मिनची उपयुक्तता दर्शविणारे पुरावे आहेत. जीवनशैलीतील बदलांव्यतिरिक्त, मेटफॉर्मिन थेरपीचा विचार मधुमेहपूर्व अवस्थेतील रुग्णांसाठी करण्याची अधिकृत मान्यता मेटफॉर्मिनला मिळणे आवश्यक आहे.

# अंतराळवीर कधी परतणार?

अमेरिकी अवकाश संशोधन संस्था - नासाचे अंतराळवीर बॅरी विल्मोर आणि सुनीता विल्यम्स हे गेले दोन महिने आंतरराष्ट्रीय अवकाश स्थानकावर (आयएसएस) मुक्कामी आहेत. बोईंग कंपनीच्या 'स्टारलायनर' या अवकाश यानाच्या चाचणीसाठी आठ दिवसांच्या नियोजनाने अवकाशात गेलेल्या दोघा अंतराळवीरांचा अवकाशातील मुक्काम यानातील तांत्रिक बिघाडामुळे वाढत चालला आहे. एकीकडे माध्यमांमधून नासा आणि बोईंग कंपनीवर याबाबत टीका होत असताना, अंतराळवीरांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देत असल्याचा निर्वाळा दोन्ही संस्थांकडून देण्यात येत आहे.नासाने सन १९६०च्या दशकात आपला मानवी अवकाश कार्यक्रम सुरू केला. प्रशिक्षित अंतराळवीरांना पृथ्वी नजीकच्या कक्षेत नेऊन पुन्हा जमिनीवर सुरक्षित आणण्यासाठी नासातर्फे मर्क्युरी, जेमिनी, अपोलो, स्पेस शटल हे कार्यक्रम राबवण्यात आले. एका महाकाय रॉकेटच्या साह्याने अवकाश यानाचे प्रक्षेपण करायचे. त्यानंतर पृथ्वीभोवतीच्या कक्षेत आपले निर्धारित काम पूर्ण करून अवकाश यान पुन्हा अलगद समुद्रावर उतरवायचे, असे सुरुवातीच्या मोहिमांचे स्वरूप होते. त्यानंतर स्पेस शटल या विमानसदृश, पुनर्वापर करता येणाऱ्या यानाचा नासाने तीन दशके वापर केला. विविध सहा स्पेस शटलच्या साह्याने अवकाश स्थानकाची उभारणी, हबल स्पेस टेलिस्कोप; तसेच अनेक उपग्रहांच्या प्रक्षेपणाचे कामही करण्यात आले. त्यांपैकीच कोलंबिया या स्पेस शटलच्या अपघातामध्ये भारतीय वंशाच्या अंतराळवीर कल्पना चावला यांचा मृत्यू झाला होता.स्पेस शटल कार्यक्रम सन २०११मध्ये थांबवल्यानंतर नासाला आपल्या अंतराळवीरांची अवकाशात ने-आण करण्यासाठी नव्या अवकाश यानांची गरज होती. अमेरिकेच्या बदललेल्या अवकाश धोरणानुसार मानवी अवकाश कार्यक्रमासाठी आवश्यक यानांची किंवा रॉकेटची बांधणी करणे, अंतराळवीरांच्या अवकाश प्रवासाचे नियोजन करणे या बाबी नासाच्या प्राथमिक उद्दिष्टांमधून वगळून नासाने संशोधनाच्या अवकाश मोहिमांवर लक्ष केंद्रित करण्याचे ठरवले. मानवी अवकाश यान आणि त्यासाठी लागणारी रॉकेट अमेरिकी उद्योगांकडून बनवून घेऊन अंतराळवीरांच्या प्रवासाचे कंत्राटही खासगी कंपन्यांना देण्याचे निश्चित झाले. त्यासाठी कंपन्यांना आवश्यक असणारे तांत्रिक आणि सुमारे आठ अब्ज अमेरिकी डॉलरचे प्राथमिक अर्थ साहाय्य नासाने देऊ केले.

# महेश सिनीयर सिटीझन ग्रुपच्या वतीने एकदिवसीय सहलीचे आयोजन

**परळी । प्रतिनिधी**

श्रावण महिन्याचे औचित्य साधून महेश सिनीयर सिटीझन ग्रुपच्या वतीने कपीलधार-मांजरसुंबा जि. बीड येथील महान संत श्री मन्मथ स्वामी महाराज आणि चाकरवाडी येथील थोर संत श्री ज्ञानेश्वर माऊली महाराज यांच्या दर्शनासाठी एकदिवसीय सहलीचे आयोजन करण्यात आले होते. जेष्ठ नागरिकांसाठी आपल्या निवृत्तीच्या काळात एक विरंगुळा म्हणून या ग्रुप ची श्री पांडुरंग सोनी यांच्या अध्यक्षतेखाली स्थापना केली. ग्रुपचा प्रमुख उद्देश म्हणजे सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक आणि धार्मिक क्षेत्रात काम करत राहणे, तसेच सर्व जण एकत्र येऊन वेळ काढून प्रत्येकाच्या सुख-दुःखात धावून जाऊन मदत करणे हा आहे. आतापर्यंत अनेक कामे केली , त्यात प्रामुख्याने दुष्काळ ग्रस्तांना मदत, सिंधुताई सपकाळ सप्ताह आयोजित कार्यक्रमात भाग व मदत, दरवर्षी उन्हाळ्यात संकटमोचन हनुमान मंदिर मोंढा मार्केट परळी वैजनाथ येथे येणाऱ्या पंचक्रोशीतील शेतकरी, व्यापारी आणि भाविकांसाठी पाणपोई ची व्यवस्था, शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणार्या सभासदांच्या विद्यार्थ्यांचा सत्कार व पुढील शैक्षणिक कार्यात मदत केली जाते. वर्षातून एकदा सात ते आठ दिवस सामुहिक सहलीचे आयोजन करण्यात येत असते. तसेच एक दिवसीय सहलीचे आयोजन केल्या जाते. त्याचाच एक भाग म्हणून २० जुलाई २०२५ रविवार रोजी श्री मन्मथ स्वामी कपीलधार व चाकरवाडी येथील संत श्री माऊली महाराज यांच्या समाधी चे भावपूर्ण आरती सह दर्शन घेतले. सहलीत सहभागी ५० सदस्य झाले होते. त्यात महीला व पुरुष यांनी मनोरंजन करत गाण्यांच्या भेंड्या, हौजी गेम, धार्मिक भजन घेत मनसोक्त आनंद द्विगुणित केला व एका आगळ्या दुनियेत मग्न झाले. अध्यक्ष व सर्व सदस्यांच्या सहकार्यांने ही एकदिवसीय सहल आनंदात पार पडली. या सहली साठी मन्मथ स्वामी मंदिर ट्रस्ट, कपीलधार चे अध्यक्ष सोमनाथआप्पा हालगे यांनी तेथे




पोहोचल्यावर दर्शना पासुन ते जेवणाची व कार्यक्रमानंतर, विश्रांतीसाठी हॉल दिला व मदत केली. आपल्या ग्रुप चे अध्यक्ष पांडुरंगजी सोनी यांनी ग्रुप च्या वतीने शब्द सुमनाने त्यांचे आभार व्यक्त केले. सदस्यांनी उपस्थित राहुन सहलीची शोभा वाढली त्या बद्दल अध्यक्षांनी सर्वांचे मनःपूर्वक आभार व्यक्त केले. या सहलीत महेश सिनियर सिटीजन ग्रुपचे अध्यक्ष श्री आणि सौ. पांडुरंगजी सोनी, श्री आणि सौ. चैनसुखजी जाजू, श्री आणि सौ.सुभाषजी तोतला, श्री आणि सौ. रामप्रसादजी मोदाणी, श्री आणि सौ. हरिप्रसादजी सारडा, श्री आणि सौ. बैजुलालजी भंडारी, श्री आणि सौ. डॉ. आर.बी. जाजु, श्री आणि सौ. ओमप्रकाशजी सारडा, श्री आणि सौ. जुगलकिशोरजी सारडा, श्री आणि सौ. द्वारकादासजी सारडा, श्री आणि सौ. डॉ. रमेशजी काबरा, श्री आणि सौ. दुर्गाप्रसादजी तापडीया, श्री आणि सौ. रमेशजी काकाणी, श्री आणि सौ. मुरलीधरजी बंग, श्री आणि सौ. महादेवआप्पा फडकरी, श्री आणि सौ. डॉ. एल.डी.लोहीया, श्री आणि सौ. श्रीकांतजी चांडक, श्री आणि सौ. रमेशजी काकाणी, श्री आणि सौ. सुधीरजी बंग, श्री आणि सौ. अशोकजी कांकरिया, ओमप्रकाशजी भुतडा, बजरंगलालजी चांडक, ओमप्रकाशजी तापडीया, वाडे साहेब, किशोरजी चांडक, पांडुरंगजी मोदाणी, राजेंदजी मालपाणी, विष्णुदास बियाणी, विजयजी मुंदडा, रविंद्रजी राठोड, तिडके साहेब, नागनाथ पारसेवार आदी सदस्यांनी सहभाग घेतला होता. सहलीचे नियोजन अध्यक्ष श्री पांडुरंगजी सोनी, सचिव श्री ओमप्रकाश जी भुतडा, उपाध्यक्ष श्री हरिप्रसादजी सारडा, कोषाध्यक्ष श्री जुगलकिशोरजी सारडा, सहसचिव प्रा. बैजुलालजी भंडारी यांनी व्यवस्थीत केले होते.

## महाराष्ट्राचे युथ आयकॉन, नामांकित पत्रकार विलास बडे व्याख्यानास मोठ्या संख्येने उपस्थित रहावे-नितीन समशेट्टे

### ना.पंकजाताई यांच्या वाढदिवसानिमित्त आज परळीत तरुणांना मार्गदर्शन

**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

राज्याच्या पर्यावरण, हवामान बदल आणि पशुसंवर्धन मंत्री तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त उद्या रविवार दि. २७ जुलै रोजी परळीत प्रसिद्ध वक्ते, आयबीएन लोकमतचे सहाय्यक संपादक विलास बडे यांचे युवकांसाठी ग्रामीण तरूणांचे भविष्यः समस्या, संधी आणि संघर्ष या विषयावर व्याखानाचे आयोजन करण्यात आले आहे. व्याखानाला युवक आणि नागरीकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन भाजपाचे नितीन समशेट्टी व त्यांच्या सहकाऱ्यांनी केले आहे.



ना. पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून माजी नगरसेवक प्रा. पवन मुंडे यांनी युवकांना मार्गदर्शन मिळावे यासाठी हा व्याख्यानाचा कार्यक्रम आयोजित केला आहे. रविवार दिनांक २७ जुलै रोजी सकाळी ११ वाजता लोकनेते गोपीनाथराव मुंडे नटराज रंग मंदिर येथे नामांकित पत्रकार विलास बडे यांचे ग्रामीण तरूणांचे भविष्यः समस्या, संधी आणि संघर्ष यावर व्याख्यान होणार आहे. ना. पंकजाताई मुंडे यांनी वाढदिवसाच्या निमित्ताने सामाजिक उपक्रम राबविण्याचे आवाहन केले होते. त्या आवाहनाला प्रतिसाद देत माजी नगरसेवक प्रा. पवन मुंडे यांनी हा कार्यक्रम आयोजित केला आहे. युवकांसाठी दिशादर्शक आणि प्रेरणा देणाऱ्या या कार्यक्रमाला तरूणांनी आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन आवाहन भाजपा नितीन समशेट्टे व सहकाऱ्यांनी केले आहे.

## कर्तृत्वाला साक्ष देणारा निरोप!

# विस्तार अधिकारी सुरेश पवार व मुख्याध्यापक प्रमोद तावरे यांचा सेवापूर्ती गौरव सोहळा

**आष्टी । रविंद्रनाथ ठाकूर**

कार्यक्षमतेचे गौरवचिन्ह म्हणजे पदोन्नती,पण खऱ्या शिक्षकाचे कार्य हे विद्यार्थ्यांच्या मनावर उमटलेल्या संस्कारांत दिसते! - हा विचार साकार झाला तो दोन आदर्श शिक्षकांच्या सेवापूर्ती गौरव सोहळ्याच्या निमित्ताने.





प्राथमिक शाळा शिदेवाडीचे मुख्याध्यापक प्रमोद तावरे सर व आष्टी येथील 'शिक्षण विस्तार अधिकारी'पदी नुकतेच सात दिवसांसाठी पदोन्नत झालेले सुरेश रामचंद्र पवार सर यांचा संयुक्त गौरव सोहळा उत्साहात पार पडला. सुरेश पवार सर हे शिक्षण क्षेत्रात एक शिस्तप्रिय,कर्मनिष्ठ व प्रेरणादायी नेतृत्व म्हणून ओळखले जातात.२१ जुलै २०२५ रोजी 'शिक्षण विस्तार अधिकारी'पदी त्यांची पदोन्नती झाली, मात्र नियत वयोमानानुसार २७ जुलै रोजीच ते सेवानिवृत्त होत आहेत.ही सात दिवसांची पदोन्नती असली तरी ती त्यांच्या चार दशकांच्या प्रामाणिक शिक्षणसेवेचा अमूल्य सन्मान ठरली.

**त्यांचे विशेष कार्यवैशिष्ट्ये:**विद्यार्थ्यांमध्ये मूल्यसंस्कारांची पेरणी शिक्षकांमध्ये कार्यसंवादाचे बळकटीकरण पर्यावरण व सामाजिक जाणीवेचा प्रचार ग्रामीण भागात दर्जेदार शिक्षणासाठी सातत्यपूर्ण उपक्रम साधेपणातही तेजस्वी नेतृत्व प्रमोद तावरे सर हे शिदेवाडी शाळेतील विद्यार्थ्यांचे मार्गदर्शक, पालकांचे विश्वासाचे अधिष्ठान आणि शाळेच्या सर्वांगीण प्रगतीचे शिल्पकार ठरले.त्यांच्या कार्यकाळात विद्यार्थ्यांची संख्या वाढली, उपक्रमशीलता जोपासली गेली आणि समाजाभिमुख शिक्षण पद्धती विकसित झाली.

# संततधार पावसामुळे जन जीवन विस्कळीत

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अंबाजोगाई तालुक्यात गेल्या तीन दिवसांपासून अधूनमधून पडणाऱ्या पावसानंतर शुक्रवारी रात्रीपासून पावसाने जोर धरला असून, शनिवारीही दिवसभर संततधार पावसाने हजेरी लावली या सतत पडणाऱ्या पावसामुळे एकीकडे शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे, तर दुसरीकडे ग्रामीण शहरीभागातील नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे त्यांचे जन जीवन विस्कळीत झाले आहे.

तालुक्यासह जिल्ह्याच्या इतर भागांमध्येही जोरदार पावसाने हजेरी लावली आहे. अंबाजोगाई शहर व परिसरात मध्यम ते जोरदार पाऊस सुरू आहे. पावसामुळे पिकांना पोषक वातावरण तयार झाले असून जलसाठ्यांमध्येही वाढ झाल्याचे

मात्र या पावसामुळे अनेक सखल भाग जलमय झाले असून, अनेक रस्त्यांवर पाणी साचल्यामुळे वाहतुकीचा खोळंबा झाला आहे. अंबाजोगाई - मुडेगाव रस्त्यावरील पुलावर पाणी आल्याने काही गावांचा संपर्क मुख्य रस्त्यांशी तुटलेला आहे. नाल्यांना पाणी आल्याने काही पुल ओलांडणे



धोकादायक बनले आहे.

शहर व ग्रामीण भागातील खड्डेमय रस्त्यांमुळे वाहनचालक आणि पादचाऱ्यांना त्रास सहन करावा लागत आहे. विद्यार्थ्यांपासून नोकरदारांपर्यंत सर्वसामान्य नागरिकांना या स्थितीचा फटका बसत आहे.

हवामान विभागाने पुढील दोन दिवस पावसाचा जोर असाच राहण्याचा अंदाज वर्तवला असून याची खबरदारी घेऊन शासनाने योग्य ती उपाय योजना करावी अशी मागणी केली आहे.

## लोकनेत्याचा वारसा-शिक्षण,पर्यावरण,आणि एक नवा उजेड

# पंकजाताईंच्या वाढदिवसानिमित्त ३ हजार विद्यार्थ्यांना वह्या, ५ हजार झाडांना माया

**वडवणी । लोकपत्रकार भांगे**

पर्यावरण संवर्धन, शालेय साहित्य वाटप आणि समाजप्रबोधनाच्या दिशेने एक आगळावेगळा आणि प्रेरणादायी उपक्रम वडवणी तालुक्यात सुरु झाला आहे. निमित्त आहे - लोकनेत्या, महाराष्ट्राच्या पर्यावरण, हवामान बदल व पशुसंवर्धन मंत्री मा. पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांच्या वाढदिवसाचे!लोकनेत्याचा वारसा या भावनिक आणि प्रेरणादायी संकल्पनेतून २१ ग्रामपंचायती अंतर्गत २१ गावे, १२ वाड्या, १५ वस्त्या, ६ तांडे आणि ५५ जिल्हा परिषद शाळांमध्ये सात दिवसांचा शैक्षणिक व पर्यावरण सप्ताह सुरू करण्यात आला आहे. यामध्ये ३००० विद्यार्थ्यांना शालेय साहित्य, वह्या आणि स्कुल बॅग वाटप होत आहे.

विशेष म्हणजे -

२१,००० वह्यांचे वाटप



५०० स्कुल बॅग

२००० कापडी पिशव्या

आणि एकूण ५००० वृक्षांचे रोपण करण्यात येणार आहे.

या उपक्रमाचे आयोजन भारतीय जनता पार्टी वडवणी तालुक्याच्यावतीने होत असून, यामागे भाजपा तालुका अध्यक्ष आणि युवा नेता संजय केशवराव आंधळे यांची संकल्पना व पुढाकार आहे.

आज या सप्ताहाची सुरुवात चिंचोटी येथील जिल्हा परिषद शाळेमध्ये सकाळी ९:३० वाजता झाली. यावेळी ग्रामस्थ, शिक्षक, विद्यार्थी यांची उत्स्फूर्त उपस्थिती दिसून आली.

यानंतर दुपारपर्यंत सोंत्रखोटा, हरिश्चंद्र पिंपरी, डोंगरेवाडी, पिंपरी टांडा, खाडेवाडी आणि लोंढेवाडी या गावांमध्ये वृक्षारोपण आणि शालेय साहित्य वाटप करण्यात आले.या उपक्रमात शिक्षणाचा दीप आणि पर्यावरणाचे संकल्पवृक्ष गावागावात रुजवण्याचा उद्देश आहे. पंकजाताईंच्या सामाजिक जाणिवेला आणि विकासदृष्टीला अभिवादन म्हणून हा उपक्रम गावकऱ्यांच्या मनात स्थान निर्माण करत आहे.

संजय आंधळे म्हणाले - हे केवळ साहित्य वाटप नाही, तर एका नव्या भविष्यासाठी आपण बीजारोपण करत आहोत. पंकजाताईंच्या कार्याचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून हा उपक्रम राबवला जात आहे.या संपूर्ण सप्ताहात ८८ बुथांवर हा उपक्रम राबवला जाणार असून, २६ जुलै ते १ ऑगस्टदरम्यान गावागावांमध्ये पोहोचून बालकांपासून वृक्षांपर्यंत सर्वांची काळजी घेण्याचा संकल्प भाजपा वडवणीने केला आहे.

## आर्यवैश्य महासभेच्या वतीने आज गुणवंत विद्यार्थी सत्कार व अमृत महोत्सव सोहळ्याचे आयोजन

समाज ऐक्य सर्व शक्य
महाराष्ट्र आर्य वैश्य महासभा

**केज । प्रतिनिधी**

शैक्षणिक क्षेत्रात चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झालेल्या आर्यवैश्य समाजातील गुणवंत विद्यार्थी व समाजातील जेष्ठ नागरिकांच्या अमृत महोत्सवी सत्कार सोहळ्याचे आयोजन महाराष्ट्र आर्यवैश्य महासभा बीडच्या वतीने आज रविवार रोजी करण्यात आले असुन या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन महासभेचे जिल्हाध्यक्ष सूर्यकांत महाजन व सचिव अजय रुद्रवार यांनी केले आहे

केज येथील श्रीराम मंगल कार्यालय याठिकाणी होणाऱ्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महासभेचे अध्यक्ष नंदकुमार गादेवार हे राहणार आहेत तर महासभेचे महासचिव गोविंद बिडवई , अमृत चे मराठवाडा विभागीय व्यवस्थापक सुशांत देशपांडे , डॉ सतिष साळुंके , यांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती राहणार आहे तरी या कार्यक्रमास बीड जिल्ह्यातील समाज बांधवानी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन जिल्हा कार्याध्यक्ष वैभव झरकर , कोषाध्यक्ष बालाजी बासटवार , या सोहळ्याचे प्रोजेकट चेअरमन प्रमोद बिडवई , सुहास चिद्रवार यांनी केले आहे.

## डोणगांव बु येथील नवसाला पावणाऱ्या महादेव मंदिरात श्रावण महोत्सवानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रम संपन्न होणार

**नांदेड । प्रतिनिधी**

नांदेडच्या बिलोली तालुक्यातील डोणगांव बु येथील नवसाला पावणाऱ्या महादेव मंदिरात श्रावण महोत्सवानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रम संपन्न होणार आहेत प्रतीवर्षी प्रमाणे याही वर्षी महादेव मंदिरात श्रावणमास मोठ्या भक्तिभावाने साजरा केला जातो दररोज पाहटे चार वाजता पासून पुजा, अभिषेक,बेल्वआर्चन,अन्न पुजा आरती, प्रसाद शिवपाठ, सांज आरती,धूप आरती आदी कार्यक्रम संपन्न होत असतात तर दर्शनासाठी आंध्रा तेलंगणा, कर्नाटकासह महाराष्ट्रातील वर्षे भरात लाखो भाविक दर्शनासाठी येतात बारस यात्रा महादेव काठी कावड यात्रेला भाविकांची गर्दी होते लाखो भाविकांना नवसाला पावणारा महादेव म्हणूनही जिल्हाभरात महादेवाची ख्याती आहे शंभू महादेववाच्या पायथ्याशी वसलेले डोणगांव बु अण गावकऱ्यांची आटूट भक्ती गावात प्रवेश करताच महादेवाचं दर्शन घेऊनच गावात प्रवेश व दर्शन घेऊन गावाबाहेर येथील पद्धत आहे श्रावण महोत्सवानिमित्त दर सोमवारी सामुहीक बेल अर्चना आरती महाप्रसाद भंडारा भजन कीर्तन प्रवचन आख्यान, आदी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे तरी भाविकांनी लाभ घ्यावा व आपले जीवन कृतार्थ करून घ्यावं.



## रिपब्लिकन पक्षाच्या महिला आघाडीच्या राष्ट्रीय मार्गदर्शक पदी सीमाताई आठवले यांची नियुक्ती

**मुंबई । प्रतिनिधी**

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले )पक्षाच्या महिला आघाडीच्या राजकीय मार्गदर्शक पदी सीमाताई आठवले यांची अधिकृत निवड जाहीर करण्यात आली रिपब्लिकन पक्षाच्या राष्ट्रीय कार्यकारणीची बैठक नुकतीच नवी दिल्ली आयोजित करण्यात आली होती या बैठकीत रिपब्लिकन पक्षाच्या महिला आघाडीच्या राष्ट्रीय मार्गदर्शक म्हणून सीमाताई आठवले यांची सर्वानुमते निवड करण्यात आली यावेळी रिपब्लिकन पक्षाच्या महिला आघाडीच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी मंजू छीबेर यांची अधिकृत निवड करण्यात आल्याचे रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री नामदार रामदास आठवले यांनी जाहीर केले.सीमाताई आठवले या केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या विविध पत्नी आहेत. यांनी अनेक वर्ष रिपब्लिकन महिला आघाडीला मार्गदर्शन केलेले आहे. सीमाताई आठवले यांच्या मार्गदर्शनात रिपब्लिकन महिला आघाडीचे संघटन वेगाने वाढून मजबूत झालेले आहे त्यामुळे सीमाताई आठवले यांची रिपब्लिकन महिला आघाडीच्या राजकीय मार्गदर्शक पदी निवड झाल्याने देशभरातून त्यांचे अभिनंदन होत आहे. रिपब्लिकन पक्षाच्या मुंबईतील महिला आघाडीच्या उपाध्यक्ष नैनाताई



वैराट यांनी सीमाताई आठवले यांची महिला आघाडीच्या राष्ट्रीय मार्गदर्शक पदी निवड झाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले आहे मुंबईसह महाराष्ट्रातील अनेक महिला कार्यकर्त्यांनी सौ सीमाताई आठवले यांचे महिला आघाडीचे राष्ट्रीय मार्गदर्शक पदी निवड झाल्याबद्दल अभिनंदन केले आहे रिपब्लिकन कार्यकर्त्यांकडून देशभरातून सौ सीमाताई आठवले यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## धानोरा रोडवरील रस्त्याची दयनीय अवस्था

# भर पावसात वंचितचे होडी चलाव आंदोलन आणि खड्ड्यांना दिला खासदार, आमदारांच्या नावाचा 'सन्मान'

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील धानोरा रोड परिसरातील ३० मीटरचा मुख्य रस्ता गेल्या पंधरा वर्षांपासून अत्यंत खराब स्थितीत असून, अपघातांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. या रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडले असून, नागरिकांना दररोज जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे. धुळीकाणामुळे व्यापारी वर्ग त्रस्त असून, विद्यार्थ्यांच्या ये-जा करण्यात अडचणी निर्माण होत आहेत.

सदर रस्त्यासाठी वर्ष २०१९-२० मध्ये डांबरीकरणाचे काम मंजूर झाले होते आणि कंत्राटदारास कार्यारंभ आदेशही देण्यात आले होते. मात्र, एका व्यक्तीने भूसंपादन मावेजाच्या मागणीसंदर्भात विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी कार्यालयाकडे दाद मागितल्यामुळे हे काम रखडले. जिल्हाधिकारी बीड यांनी स्पष्ट केल्याप्रमाणे, २०१४ पूर्वी हा रस्ता जिल्हा परिषद बीडच्या अखत्यारीत होता, म्हणून भूसंपादनासाठी जिल्हा परिषद जबाबदार आहे. संबंधित प्रस्तावही बांधकाम विभाग क्र. १, जि.प. बीड मार्फत सादर करण्याचे आदेश देण्यात आले होते.मात्र, प्रकरण उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात प्रलंबित असल्यामुळे काम पूर्णतः थांबवण्यात आले आहे. यासंदर्भात वंचित बहुजन आघाडी बीडच्यावतीने जिल्हाधिकारी, बीड नगरपरिषद व संबंधित लोकप्रतिनिधींच्या भूमिकेवर गंभीर आरोप करण्यात आले आहेत. नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने प्रशासनाने दुर्लक्ष केल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे.

**प्रमुख मागण्या पुढे अशा मांडण्यात आल्या आहेत –** रस्त्याचे काम थांबवण्यामागील नेमके कारण व न्यायालयीन प्रकरणाची माहिती जाहीर करावी. भूसंपादनाचा वाद तातडीने निकाली काढावा. उच्च न्यायालयात प्रलंबित प्रकरणाचा निपटारा करण्यासाठी शासनस्तरावर प्रयत्न व्हावेत. डांबरीकरणाचे काम त्वरित सुरू करावे. सदर मागण्यांकडे प्रशासन व लोकप्रतिनिधींकडून सतत दुर्लक्ष झाल्यामुळे वंचित बहुजन आघाडी बीडच्या वतीने होडी चलाव आंदोलन व खड्ड्यांचे नामकरण सन्मान सोहळा धानोरा रोड परिसरात आयोजित करण्यात आला. या आंदोलनात व्यापारी, विद्यार्थी, महिला आणि नागरिकांचा मोठा सहभाग दिसून आला. नागरिकांच्या जिवीत सुरक्षिततेशी खेळणाऱ्या प्रशासनाच्या उदासीनतेचा निषेध करत आंदोलनात अनेकांनी रस्त्यावरील खड्ड्यांना नावं देत प्रशासनाच्या निद्रिस्त कारभारावर बोट ठेवलं. आता हे आंदोलन अधिक तीव्र करण्यात येणार असल्याची माहिती वंचित बहुजन आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी दिली. यावेळी वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष अजय सरवदे, जिल्हा उपाध्यक्ष पुरुषोत्तम वीर, सहसंघटक अर्जुन जंजाळ, जिल्हा प्रसिद्धीप्रमुख राजेश कुमार जोगदंड, सम्यक विद्यार्थी आंदोलनाचे जिल्हाध्यक्ष रोहन मगर, महिला जिल्हा उपाध्यक्ष पुष्पाताई तुरुकमाने, ता.किरण वाघमारे, शहराध्यक्ष लखन जोगदंड, संदीप जाधव, आकाश साबळे, शेख पाशाभाई, प्रकाश उजगरे, प्रदीप खळगे, राजाभाऊ घोषीर, सतीश क्षीरसागर, अभिजित बनसोडे, आप्पा पवार, मिलिंद सरपते यांच्यासह व्यापारी, शाळकरी विद्यार्थी यांनी सहभाग नोंदवला आहे.




### खड्ड्याला दिले खासदार आमदाराचे नाव

**धानोरा रोडचे डांबरीकरणाचे काम तात्काळ पोलीस बंदोबस्तामध्ये करण्यात यावे या मागणीसाठी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने होडी चलाव आंदोलन करण्यात आले तसेच रस्त्यावरील खड्ड्यामध्ये तलावाचे स्वरूप आल्याने एका खड्ड्याला खासदार बजरंग बप्पा सोनवणे खड्डा, दुसऱ्या खड्ड्याला आमदार संदीप क्षीरसागर खड्डा आणि तिसऱ्या खड्ड्याला मुख्याधिकारी नीता अंधारे खड्डा असे नामकरण केले आहे. लवकरच महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्हा पालकमंत्री अजित दादा पवार व जिल्हाधिकारी विवेक जॉनसन यांचेही नाव खड्ड्याला देण्यासाठी धानोरा रोडला व्यापक बैठकीचे आयोजन करण्यात येणार असल्याचे जिल्हाध्यक्ष अजय सरवदे यांनी सांगितले.**

## राष्ट्रीय चर्मकार महासंघ महाराष्ट्र चर्मकार महासंघाच्या मराठवाडा सोशल मीडिया प्रमुखपदी राजेंद्र कांबळे

**नायगाव । प्रतिनिधी**

राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे नांदेड जिल्हा अध्यक्ष पद हे आपल्या खांद्यावर घेऊन या माध्यमातून गेल्या अनेक वर्षापासून विविध सामाजिक कार्यक्रमांची ज्यांनी आयोजन करून समाजाला एक विकासासह परिवर्तनाची दिशा दाखविणारे राजेंद्र कांबळे यांच्या सामाजिक कार्याची दखल घेऊन सदर महासंघाचे संस्थापक अध्यक्ष माजी मंत्री बबनराव घोलप यांच्या आदेशाने राज्य अध्यक्ष माधवराव गायकवाड व विदर्भ प्रमुख नांदेड जिल्ह्याचे निरीक्षक संभाजी वाघमारे उपस्थित नांदेड जिल्ह्याचे लोकप्रिय खासदार मा.रवींद्र पाटील चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली नांदेड जिल्ह्याची कार्यकारणीत राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या मराठवाडा सोशल मीडिया प्रमुख पदी प्रमुख कांबळे राजेंद्र यांची निवड करण्यात आली राजेंद्र कांबळे हे मुळातच सामाजिक गुण असलेलं व्यक्तिमत्व म्हणून सर्वांना परिचित आहे त्यांनी समाजाचे काही देणे लागतो म्हणून अतिशय प्रामाणिकपणे विविध कार्यक्रमांचे आयोजन करून समाजाला एक वैचारिक समाज संघटन बांधण्यासाठी डोस दिलेला आहे, या कार्याची दखल घेऊन राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या जिल्हाध्यक्षपदी त्यांची निवड यापूर्वी केलेली होती त्यातूनही राजेंद्र कांबळे यांनी सामाजिक कार्य दाखवुन आपल्या कार्यकर्तुत्वाचा ठसा उमटविला म्हणून त्यांची नांदेड येथील नुकत्याच संपन्न झालेल्या बैठकीमध्ये सदर संघटनेच्या मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये मराठवाडा सोशल मीडिया प्रमुख पदी निवड केल्याने त्यांचे अभिनंदन देगलूर नगर परिषदेचे नगरसेवक प्रतिनिधी मा. व्यंकटराव कांबळे, राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे युवा सचिव संजय सोनटक्के यासह सुरेश शेळके के के गंगासागरे, प्रकाश वानखेडे विठ्ठल वाघमारे रविराज गंगासागरे,विशाल बनसोडे बालाजी गंगासागरे,गजानन जोगदंड यासह अधिजनाने अभिनंदन करून शुभेच्छा दिले.




## महिलेस फोनवर अश्लिल संभाषण व शिवीगाळ करणाऱ्या माजी मुख्याध्यापकवर पुन्हा गुन्हा दाखल

**केज । प्रतिनिधी**

जुन्या भांडणाच्या कारणावरून एका महिलेस अश्लिल संभाषण व शिवीगाळ करणाऱ्या माजी मुख्याध्यापक तथा वकील महेबुब काझी याच्यावर केज पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत मांडवा, ता. वाशी, जि. उस्मानाबाद धाराशिव (हल्ली मुक्काम केज, जि.बीड) येथील आसिया सलाहुद्दीन काझी यांनी दिनांक २५ जुलै, २०२५ रोजी केज पोलिस ठाण्यात तक्रार दिली. त्यात फिर्यादी यांनी म्हटले आहे की दिनांक २४.०७.२०२५ रोजी सायंकाळी ०६:२७ वाजण्याचा सुमारास त्यांचा सख्खा दिर ड. मेहबुब काझी (निवृत्त मुख्याध्यापक) याने मांडवा, ता. वाशी येथील फिर्यादीच्या प्रापर्टीबाबत बोलणे सुरु करून फिर्यादींना अश्लिल भाषेत संभाषण व शिवीगाळ केली.



म्हणून केज पोलिस ठाण्यात फिर्यादींच्या तक्रारीवरून आरोपी मेहबुब काझी याच्याविरुध्द भारतीय न्याय संहितेचे कलम ७९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलिस कॉन्स्टेबल त्र्यंबक सोपने हे करीत आहे.

यापुर्वीही व्हॅट्सपवर एका महिला आणि लहान मुलीबाबत अश्लिल व अभद्र भाषेत टिप्पणी केल्याप्रकरणी आरोपी महेबुब काझी याच्याविरुध्द दिनांक ३१.०१.२०२५ रोजी मुंबई येथील माता रमाबाई आंबेडकर पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहितेचे कलम ७९ आणि ३५६ (२) प्रमाणे गुन्हा दाखल झाल्याने त्यास मुंबई पोलिसांच्यावतीने अटक करून जामीनावर सोडण्यात आलेले आहे. त्याचप्रमाणे दिनांक ०६.०७.२०२५ रोजी आरोपी मेहबुब काझी, त्याची मुलगी ड. फिजा काझी, त्याचा मुलगा जाहेद काझी आणि पत्नी शाहीन काझी या चौघांविरुध्दही पोलिस ठाणे वाशी, जि. उस्मानाबाद - धाराशिव येथे घरात घुसून अतिक्रमण करण्याच्या प्रयत्न केल्याप्रकरणी भारतीय न्याय संहितेचे कलम ३२९ (२), ३२९ (३), ३५२ आणि ३५१ (२) प्रमाणे गुन्हा दाखल असून त्यातही नमुद चारही आरोपी जामीनावर आहे. तरीही नमुद आरोपींना कायद्याचे कोणतेही धाक नसल्याने त्यांच्या गुन्ह्यांचे सत्र सुरुच आहे.

## साबला येथे तरुणाची गळफास घेऊन आत्महत्या

**केज । गौतम बचुटे**

केज तालुक्यात साबला येथे अजय अशोक काकडे या ३० वर्षीय तरुणाने पत्र्याच्या शेडमध्ये गळफास घेऊन आत्महत्या केली आहे.



दि. २६ जुलै रोजी केज तालुक्यातील साबला येथे अजय अशोक काकडे या ३० वर्षीय तरुणाने एका पत्र्याच्या शेडमध्ये गळफास घेऊन आत्महत्या केली. ही माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले. प्रेताची उत्तरीय तपासणी करून शवविच्छेदन करण्यात आले. अजय काकडे हा विवाहित असून त्याला एक दोन वर्षा मुलगा आहे. त्याच्या आत्महत्येचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. त्याच्या पश्चात पत्नी, लहान मुलगा व आई- वडील असा परिवार आहे.

या प्रकरणी केज पोलीस ठाण्यात अद्याप आकस्मिक मृत्यूची नोंद झालेली नाही. नोंद होताच पोलिस निरीक्षक स्वप्नील चौधरींच्या मार्गदर्शनाखाली तपास करण्यात येणार आहे.

# मुलगी वारल्याची जावयाने खोटी माहिती दिली अन् सासऱ्याला मारहाण करून बरगडी मोडली!

**केज । गौतम बचुटे**

तुमची मुलगी वारली आहे. तुम्ही लवकर या. असे म्हणून एका जावयाने आणि त्याच्या भावाने सासरा आणि चुलत सासऱ्याला त्यांच्या गावात बोलावून मारहाण करून त्यांना जखमी केले आहे.

या बाबतची माहिती अशी की, केज तालुक्यातील पिराचीवाडी येथील आत्माराम कराड यांच्या मुलीचे लग्न खाडेवाडी ता. केज येथील हनुमंत खाडे याच्या सोबत झालेले आहे. दि. २२ जुलै रोजी रात्री ८:३० वा. च्या सुमारास हनुमंत खाडे याने त्याचे सासरे आत्माराम कराड यांना फोन करून खोटी माहिती दिली की, त्यांची मुलगी वारली आहे. लवकर या.



अशी माहिती मिळताच आत्माराम कराड आणि त्यांचे भाऊ गोरख कराड हे रात्री १०:३० वा.च्या सुमारास खाडेवाडी येथे गेले. घरी गेल्या नंतर चौकशी केली असता जावई हनुमंत खाडे याने त्यांच्याकडे तुमची मुलगी वेळेवर स्वयंपाक करत नाही. अशा प्रकारच्या तक्रारी केल्या. त्यावर आत्माराम कराड हे जावई हनुमंत खाडे याला म्हणाले की, तुम्ही दारू पिऊन मुलीला मारहाण करून शिवीगाळ करता आणि तिचा छळ करीत आहात. त्यामुळे आम्ही मुलीला माहेरी घेऊन जातो. असे म्हणताच जावई हनुमंत खाडे याने तुम्ही माझ्या दारातले उठा. असे म्हणुन त्यांना शिवीगाळ केली. त्या नंतर जावायाचा भाऊ नितीन खाडे याने त्यांना लाकडाने डावे बरगडीवर मारून बरगडीची फासुळी फॅक्चर केली. तसेच जावई हनुमंत खाडे याने मोटार सायकलच्या चैनला लावलेले किचैन डोक्यात मारून डोके फोडले. त्याचे वडील राजेभाऊ खाडे यांनीही त्यांना लाथाबुक्यांनी मारहाण केली आणि विहीन चिंगु खाडे हिने देखील शिवीगाळ केली. तसेच गोरख कराड यांनाही शिवीगाळ आणि मारहाण करून जिवे मारण्याची धमकी दिली. आत्माराम कराड यांच्या तक्रारी वरून २५ जुलै रोजी नितीन खाडे, हनुमंत खाडे, राजेभाऊ खाडे आणि चिंगु खाडे या चार जणांच्या विरुद्ध केज पोलिस ठाण्यात गु. र. नं. ४१२/२०२५ भा. न्या. सं. ११५(२), ११७(२), ११८(१), १५१(२), १५१(३), ३५२, ३(५) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या मार्गदर्शाखाली पोलिस कॉन्स्टेबल उमेश आघाव हे तपास करीत आहेत.

# केवळ डिग्री असून उपयोग नाही, डिग्री घेताना काय शिकलो हे महत्त्वाचं आहे प्रा. प्रदीप रोडे यांचे पालक मेळाव्यात मार्गदर्शन

### तुलसी महाविद्यालयात शिक्षक-पालक संवाद मेळावा संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

केवळ डिग्री असून उपयोग नाही, डिग्री घेताना काय शिकलो हे महत्त्वाचं आहे. भूतकाळात काय केलं यापेक्षा, आज काय करता हे निर्णायक ठरतं, असा प्रेरणादायी संदेश देवगिरी प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष प्रा. प्रदीप रोडे यांनी विद्यार्थ्यांना दिला. ते शनिवार, दिनांक २६ जुलै रोजी तुलसी संगणकशास्त्र आणि माहिती तंत्रज्ञान महाविद्यालयात आयोजित बीसीएस प्रथम वर्षाच्या पालक-शिक्षक संवाद मेळाव्यात प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते.




प्रा.प्रदीप रोडे यांनी Present is hard cash, Future is promissory note, Past is dead cheque असे उदाहरण देत विद्यार्थ्यांना वर्तमानावर लक्ष केंद्रित करण्याचा सल्ला दिला. त्यांनी सांगितले की, तीन वर्षे खूप मेहनत करा आणि उरलेले आयुष्य एसीमध्ये बसून जगा, या वाक्यातून त्यांनी आजचा अभ्यासच उद्याचा आराम आहे हा संदेश दिला.ते पुढे म्हणाले की, जपानसारखी राष्ट्रे मुलांना लहान वयापासून शिस्तबद्ध व गुणवत्तापूर्ण शिक्षण देतात, म्हणूनच ती ऑलिंपिकसारख्या जागतिक स्पर्धांमध्ये आपली छाप पाडतात. आपल्यालाही शिक्षणाला सर्वोच्च प्राधान्य द्यावे लागेल. डिसिप्लेन मुळे चांगल्या सवयी लागतात असे सांगत त्यांनी विद्यार्थ्यांना इंग्रजी, संगणक,लायब्ररी आणि स्पर्धा परीक्षांसाठी लागणाऱ्या कौशल्यांचा फायदा घेण्याचे आवाहन केले.या मेळाव्यात महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.डी.जी.निकाळजे यांचेसह सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. संवाद सत्रात पालकांनी आपले अनुभव, अपेक्षा आणि शंका मोकळेपणाने मांडल्या. प्राचार्यांनी त्या गांभीर्याने ऐकून घेत, गरजेनुसार सकारात्मक सुधारणा राबवण्याचे आश्वासन दिले.कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी डॉ. योगिता लांडगे यांनी पालकांचे आभार मानले. हा संवादात्मक आणि प्रेरणादायी मेळावा पालक, विद्यार्थी व शिक्षक यांच्यातील परस्पर संवाद व समन्वय अधिक दृढ करणारा ठरला.

## काशीदवाडी ता.केज येथे ह.भ.प.जनाई महाराज कोकाटे यांचे किर्तन

**केज । प्रतिनिधी**

काशीदवाडी येथे अखंड हरिनाम सप्ताहाचे भव्य दिव्य नियोजन या सप्ताहात महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध किर्तनकारांची उपस्थिती



पहिल्याचदिवशी झिटॉकीज फेमस ह.भ.प.तुकाराम महाराज मुंडे शास्त्री,ह.भ.प.आप्पासाहेब महाराज चौरे श्री क्षेत्र चौंडी,ह.भ.प.जनाई महाराज कोकाटे संगमकर कन्हैया आध्यात्मिक वारकरी शिक्षण संस्था परळी,बालयोगी वेदशास्त्रसंपन्न ह.भ.प.हरिहर महाराज दिवेगावकर, महाराष्ट्रातील प्रसिद्ध विनोदाचार्य शिवमहापुराण कथा प्रवक्ते ह.भ.प.प्रकाश महाराज साठे श्रीक्षेत्र सोनीमोहा,ह.भ.प.कृष्णा महाराज चवरे श्री क्षेत्र पंढरपूर, वेदशास्त्रसंपन्न व्याकर्णाचार्य आचार्य ह.भ.प.अर्जुन महाराज लाड गुरूजी होळ वारकरी शिक्षण संस्था होळ,ह.भ.प.महंत भगवान महाराज वरपगावकर यांच्या काल्याच्या कीर्तनाने कार्यक्रमाची सांगता होणार आहे केज मसाजोग परिसरातील गायणाचार्य वादनाचार्य मोठ्या संख्येने उपस्थित राहाणार आहेत.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077